महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,नागपूर विभागीय मंडळ ,सिव्हिल लाईन्स ,नागपूर -४४०००१
Email : msboardnagpur@gmail.com

महत्वाचे
कालमर्यादीत

पत्र क्रमांक : नाविमं / उमा / गोमा. प्रात्य. / 1781
नागपूर, दिनांक :13 / 06 / 2025

प्रति,
प्राचार्य / मुख्याध्यापक,
सर्व मान्यता प्राप्त शाळा व क.महाविद्यालये,
नागपूर विभाग नागपूर.

विषय : माध्यमिक व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा (इ.10 वी व 12 वी) जुन / जुलै 2025 मध्ये घेण्यात येणाऱ्या प्रात्यक्षिक / तोंडी / श्रेणी परीक्षेच्या वेळापत्रकाबाबत
संदर्भ : 1 राज्य मंडळ, पुणे यांचे पत्र क्र.रा.मं. / परीक्षा–6 / 1764, पुणे, दि. 22 / 05 / 2025

उपरोक्त संदर्भीय विषयास अनुसरून आपणांस कळविण्यात येते कि, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळामार्फत जुन / जुलै 2025 मध्ये आयोजित करण्यात येणाऱ्या माध्यमिक (इ.10 वी ) लेखी परीक्षा दि. 24 / 06 / 2025 ते 08 / 07 / 2025 व उच्च माध्यमिक परीक्षा दि. 24 / 06 / 2025 ते 16 / 07 / 2025 (इ.12 वी ) या कालावधीत आयोजित करण्यात आलेल्या आहेत. सदर परीक्षांकरीता मंडळामार्फत internal – external ची नियुक्ती करण्यात येणार नाही. करीता उपरोक्त परीक्षांचे नियोजन शाळा /क.महाविद्यालयांनी त्यांच्या स्तरावर करुन त्याचा अहवाल मंडळास सादर करावा. तसेच परीक्षेचा कालावधी मर्यादित असल्याने OUT OF TURN ची प्रात्यक्षिक परीक्षा घेण्यात येणार नाही, याची नोंद घेऊन संबंधित विद्यार्थ्यांना याबाबत जाणीव करून देण्यात यावी.

दि. 24 / 06 / 2025 ते 08 / 07 / 2025 (इ.10 वी ) व उच्च माध्यमिक परीक्षा दि. 24 / 06 / 2025 ते 11 / 07 / 2025 (इ.12 वी) या तारखेदरम्यान प्रात्यक्षिक / तोंडी / अंतर्गत मूल्यमापण / श्रेणी परीक्षेचे ऑनलाईन गुण मंडळाकडे सादर करुन ऑनलाईन सादर केलेल्या अंतिम गुण / श्रेणीच्या यादया तसेच प्रात्यक्षिक उत्तरपत्रिका मंडळाकडे खाली दिलेल्या जिल्हा संकलन केंद्रावर सादर करावे.

सदर परीक्षेसाठी आवश्यक असणारे साहित्य मंडळामार्फत दि. 17 / 06 / 2025 रोजी सकाळी 11.00 ते 5.00 या वेळेत जिल्हा संकलन केंद्रावर वाटप करण्यात येईल. त्यासाठी शाळा /क.महाविद्यालय यांनी आपला प्रतिनिधी अधिकार पत्रासह पाठविण्याची व्यवस्था करावी. ऑनलाईन सादर केलेल्या अंतिम गुण /श्रेणीच्या यादया तसेच प्रात्यक्षिक उत्तरपत्रिका दि. 14 / 07 / 2025 रोजी संकलन केंद्रावर जमा करावे.

**संकलन केंद्र.– साहित्य वाटप व साहित्य स्विकारणे खालील दिलेल्या संकलन केंद्रावर करण्यात येईल.**

1) लाल बहादूर शास्त्री कनिष्ठ महाविद्यालय, भंडारा
2) हिंदी सिटी हायस्कूल, चंद्रपूर
3) नागपूर विभागीय मंडळ कार्यालय, नागपूर
4) न्यू. इंग्लिश कनिष्ठ महाविद्यालय, वर्धा
5) शिवाजी विज्ञान कनिष्ठ महाविद्यालय, गडचिरोली
6) गुजराती नॅशनल कनिष्ठ महाविद्यालय, गोंदिया

(रविंन्द्र काटोलकर)
विभागीय सचिव,
नागपूर विभागीय मंडळ, नागपूर

प्रतिलिपीः–

1) सचिव, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, भांबुर्डा, पुणे यांचे माहितीस्तव समादराने.
2) विभागीय शिक्षण उपसंचालक, नागपूर विभाग, नागपूर यांना माहिती करीता समादराने अग्रेषित.
3) शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जि. प. भंडारा / चंद्रपूर / नागपूर / वर्धा / गडचिरोली गोंदिया यांना माहिती करीता व उचित कार्यवाहीस्तव कळविण्यात येते की आपले अधिनस्त सर्व मान्यता प्राप्त कनिष्ठ महाविद्यालयांना आपल्या स्तरावरुन लेखी कळविण्यात यावे.